महाराष्ट्र शासन
सहायक आयुक्त,समाज कल्याण, कोल्हापूर.
डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, विचारेमाळ, कोल्हापूर.
Email :- acswokolhapur@gmail.com
दु.क्र. ०२३१-२६५१३१८
जा.क्र. सआसकको/जि.द.व.नि/बैठक/इतिवृत्त/२०२१-२२/४१८९
दिनांक- ०१.११.२०२१.
१०/११/२०२१

## जिल्हा दक्षता व सनियंत्रण समितीच्या दिनांक २७.१०.२०२१ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

जिल्हा दक्षता व सनियंत्रण समितीची सभा दिनांक २७.१०.२०२१ रोजी मा.जिल्हाधिकारीसो, कोल्हापूर यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी यांचे दालनात सायंकाळी ०६.०० वा. संपन्न झाली. सदर सभेस खालील शासकीय सदस्य तसेच निमंत्रीत उपस्थित होते.

| अ. क्र. | नांव व हुद्दा | समितीतील पद |
|---|---|---|
| १. | मा. श्री. राहूल रेखावार . जिल्हाधिकारीसो, कोल्हापूर. | अध्यक्ष |
| २. | मा.श्री.शैलेश बलकवडे. पोलिस अधिक्षकसो, कोल्हापूर. | सदस्य |
| ३. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी. | सदस्य |
| ४. | मा.जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय यांचे प्रतिनिधी वृषाली पाटील | सदस्य |
| ५. | मा.जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि.प.कोल्हापूर. | सदस्य |
| ६. | मा.पोलिस निरीक्षक, ना.ह.सं पथक, कोल्हापूर. | निमंत्रित |
| ७. | मा.जिल्हा महिला व बालविकास अधिकारी , कोल्हापूर.यांचे प्रतिनिधी. | निमंत्रित |
| ८. | मा.श्री.रणजीत पाटील, एल.सी.बी.कोल्हापूर. | निमंत्रित |
| ९. | मा.श्री.निरंजन कदम.कोल्हापूर. | अशासकीय सदस्य |
| १० | मा.श्री.राजू मालेकर , कोल्हापूर. | अशासकीय सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ११. | मा.यामीर बापूसो शेख, ना.ह.सं.कोल्हापूर | निमंत्रित |
| १२. | श्री. विशाल लोंढे, सहायक आयुक्त, समाज कल्याण, कोल्हापूर. | सदस्य सचिव |

सहायक आयुक्त, समाज कल्याण, तथा सदस्य सचिव, जिल्हा दक्षता व सनियंत्रण समिती, कोल्हापूर यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा.अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने सभेच्या कामकाजास सुरुवात केली. मागील इतिवृत्त वाचून कायम करणेत आले. सभेमधील झालेली चर्चा व निर्णय पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र | विषय | चर्चा व मा.अध्यक्ष महोदय यांनी दिलेल्या सूचना | कार्यवाही करावयचा विभाग |
|---|---|---|---|
| १. | मागील इतिवृत्त कायम करणेबाबत. | मा.अध्यक्ष महोदय यांनी मागील इतिवृत्त कायम करतेवेळी कार्यवाहीच्या मुद्दांचा आढावा घेतला असता, मनोधैर्य प्रकरणांमध्ये किमान किती अर्थसहाय्य दिले जाते तसेच समाजकल्याण विभागाकडे प्राप्त प्रकरणांना पोक्सो कायद्याची कलमे लागली असतील तर त्यानुसार जिल्हा विधी व सेवा प्राधिकरण, कोल्हापूर यांचे मार्फत देण्यात येणा-या अर्थसहाय्याचा लाभ लागू करणे आहे किंवा कसे? याबाबत सहायक आयुक्त यांनी समितीसमोर मांडले असता मा.पोलिस अधिक्षक यांनी विभागीय दक्षता समितीमध्ये सदर प्रकरणात दोन्ही लाभ देणेबाबत सूचना असलेचे सांगितले.त्यानुसार यापूढे कार्यवाही करण्याची दक्षता घेणेत येत असलेचे सहायक आयुक्त यांनी सांगितले. | सहायक आयुक्त,समाज कल्याण कोल्हापूर. |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | पोलिस विभागाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा आढावा. | याबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी विचारणा केली असता पंधरा प्रकरणे पोलिस तपासावरमा.पोलिस अधिक्षक यांनी सांगितले.<br>याबाबत प्रकरणनिहाय आढावा घेतला असता शाहूवाडी येथील २६२/२०१९ हा गुन्हा पोलिस तपासावर अनून याबाबत सदर गुन्हा त तत्काळ निर्गत करण्याबाबत पोलिस विभागास मा.अध्यक्ष महोदय यांनी आदेशित केले आहे.<br>तसेच जातीचा दाखला व वैद्यकीय दाखल्याअभावी प्रलंबित गुन्हयांमध्ये तीन स्मरणपत्रे देवून संबंधितांना अवगत करणेबाबत पोलिस विभागास मा.अध्यक्ष यांनी आदेशित केले. | पोलिस विभाग |
| ३. | ॲट्रोसिटी अंतर्गत प्राप्त प्रकरणांचा अर्थसहाय्याचा आढावा. | याबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी सहायक आयुक्त कार्यालयाच्या सप्टेंबर २०२१ पर्यंतच्या प्रकरणांचा आढावा घेतला.एकूण ७७ प्रकरणे नोंद झाली असून पहिला व दुसरा हप्ता एकूण ५९ प्रकरणांमध्ये मंजूरीस आहे, व १८ प्रकरणे कागदपत्रांअभावी प्रलंबित असलेचे सहायक आयुक्त यांनी सांगितले.<br>याबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी प्रकरणांचा गोषवारा पहिला हप्ता,दुसरा हप्ता व तिसरा हप्ता निहाय सादर करावा.तसेच मागील वर्षीच्या प्ररकणाचाही तपशिल सोबत बैठकीमध्ये देण्यात यावा असे मा.अध्यक्ष यांनी आदेशित केले.<br>यामध्ये कागदपत्रांअभावी एफआयआर व दोषारोपाअभावी प्रलंबित असा तपशिल सोबत असावा अशा सूचना मा.अध्यक्ष महोदय यांनी दिल्या. प्रकरणांमध्ये पिडीत जास्त असल्यास त्यांना लाभ देणेत यावा तसेच सहायक आयुक्त यांनी पिडीतांच्या घरी भेटी द्यावयात व ज्या ठिकाणी मा.जिल्हाधिकारी यांच्या भेटी आवश्यक आहेत त्या ठिकाणी भेटी देणेबाबत अशा सूचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या आवश्यक असलेचे निदर्शनास आणून देवून भेटीचे नियोजन करावे. | सहायक आयुक्त,समाज कल्याण कोल्हापूर. |
| ४ | मृत्यू व खून प्रकरणांमध्ये पेन्शन | याबाबत सहायक आयुक्त यांनी मृत्यू व खून प्रकरणांमध्ये आवश्यकता असल्यास पेन्शन देणेची बाब शासन निर्णयात असलेचे समितीसमोर मांडले असता मा.अध्यक्ष यांनी अशा प्रकरणांचा आढावा घेवून | सहायक आयुक्त,समाज कल्याण |

| | | | |
|---|---|---|---|
| | देणेबाबत. | आढावा घेवून आवश्यकता असलेची पडताळणी करून समितीसमोर प्रकरणे ठेवावीत असे सूचित केले. | कल्याण कोल्हापूर. |

वरीलप्रमाणे विषयांवर चर्चा करणेत आली.मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने बैठक समाप्त करण्यात आली.

**विशाल लोंढे**
**सदस्य सचिव,**
**जिल्हा दक्षता व सनियंत्रण समिती**
**तथा सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण, कोल्हापूर.**

१०/०४/११/५

**राहुल रेखावार(भा.प्र.से.)**
**अध्यक्ष,**
**जिल्हा दक्षता व सनियंत्रण समिती**
**तथा जिल्हाधिकारी कोल्हापूर.**

**प्रत**

१.मा. आयुक्त, समाज कल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे, यांना सविनय सादर.

२.प्रादेशिक उपायुक्त,समाजकल्याण पुणे विभाग पुणे, यांना माहितीस्तव.

**जा.क्र.सआसकको/जि.द.व.स.स/बैठक/इतिवृत्त/** ४१८९ **दि.** १०/११/२०२१

**प्रति,**

---------------

---------------

**जिल्हा दक्षता व सनियंत्रण** समिती, कोल्हापूर बैठक बुधवार दिनांक २७ ऑक्टोंबर २०२१ रोजी सायं.०६.०० वाजता संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त आपणास पाठविण्यात येत असून आपणाशी निगडीत मुद्दा क्र.--------------- बाबत उचित कार्यवाही करून या कार्यालयास अवगत करावे, ही विनंती.

**विशाल लोंढे**
**सदस्य सचिव,**
**जिल्हा दक्षता व सनियंत्रण समिती**
**तथा सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण, कोल्हापूर.**

D:\PATIL\2021-22\PCR\Itivrutta\Etiwrut 21.10.2021.docx